# मेट्रो-३ भुयारीकरणाचा २५ वा टप्पाही पूर्ण




**म. टा. प्रतिनिधी, मुंबई**

कुलाबा-वांद्रे-सीप्झ हा मेट्रो मार्गाच्या भुयारीकरणाच्या कामात वरळी परिसरातील अत्यंत महत्त्वाचा आणि क्लिष्ट असा २५वा टप्पा बुधवारी यशस्वीपणे पार पडला. या मार्गातील एकूण ७ पॅकेजपैकी पॅकेज-३ चा हे सर्वात लांब पॅकेज असून या अंतर्गत मुंबई सेंट्रल, महालक्ष्मी, सायन्स म्युझियम, आचार्य अत्रे चौक व वरळी या स्थानकांचा समावेश आहे. यावेळी पर्यटन व पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे उपस्थित होते. 'हा महत्त्वाचा प्रकल्प आहे. यामुळे मुंबईकरांच्या रोजच्या प्रवासाच्या समस्या सुटतील. हा प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत', अशी प्रतिक्रिया त्यांनी यावेळी दिली.

गतवर्षी २७ सप्टेंबर रोजी सायन्स म्युझिअमच्या उत्तर दिशेपासून 'तानसा-१' हे पॅकेज-३ चे टनेल बोअरिंग मशीनने भुयारीकरणाचे काम सुरू केले. अनेक भौगोलिक आव्हानांना सामोरे जाऊन 'अप लाइन' बोगद्याचे तब्बल २०७३ मीटर भुयारीकरण पूर्ण केले. या भुयारीकरणासाठी १३८१ सेगमेंट रिंग्सचा वापर करण्यात आला आहे. कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो मार्गासाठी एकूण १७ टीबीएम, ३३.५ किमी लांब मार्गिकेवर कार्यरत आहेत. 'प्रकल्पाचा आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठल्याचा मला आनंद आहे.

आमच्या अभियंत्यांच्या व तज्ज्ञांच्या टीमने हे आव्हानात्मक काम अगदी सुलभरित्या पार पाडले आहे.' अशी प्रतिक्रिया 'एमएमआरसी'चे व्यवस्थापकीय संचालक रणजीत सिंह देओल यांनी दिली. तसेच आतापर्यंत उपनगरीय रेल्वेद्वारे न जोडली गेलेली मुख्य व्यापारी केंद्र पॅकेज-३ द्वारे जोडली जाणार आहेत. मेट्रो-३ कार्यान्वित झाल्यावर या भागात नियमित प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी नवसंजीवनी ठरेल, असेही ते म्हणाले.

"

**मेट्रो -३ मार्गिकेवरील प्रगतीपथावर असल्याचे बघून आनंद वाटला. प्रकल्पाचे आतापर्यंत जवळपास ७८% भुयारीकरण व ५०% हुन अधिक बांधकाम पूर्ण झाले आहे. एमएमआरसी याच उत्साहाने व गतीने प्रकल्पाचे काम सुरू ठेवेल याची मला खात्री आहे.**

**- आदित्य ठाकरे,**
पर्यटन व पर्यावरण मंत्री